सांकेतांक 2015121922

NO2015121922

264
263

RNI No. MAHBIL/2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष १, अंक १३८] शनिवार, डिसेंबर १९, २०१५/अग्रहायण २८, शके १९३७ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक २८१

### प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

### महसूल व वन विभाग

मंत्रालय मुख्य इमारत, १ ला मजला, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२,
दिनांक १९ डिसेंबर, २०१५.

### अधिसूचना

**महाराष्ट्र धारण जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम.**

क्रमांक : संकीर्ण-२०१५-प्र.क्र. १७६-ल-१.—

महाराष्ट्र धारण जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम (सन १९४७ चा ६२) याच्या कलम ५ च्या पोट-कलम (२) व (३) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून व शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्रमांक सीओएन-३३६०-३३०६५-एम, दिनांक १४ मे, १९६२, जी महाराष्ट्र शासनाचे राजपत्रात भाग ४-ब मध्ये दिनांक १७-५-१९६२ रोजी प्रसिद्ध केली होती, ती यवतमाळ जिल्ह्यापुरती अधिक्रमित करून, महाराष्ट्र शासन, शासकीय अधिसूचना क्र. संकीर्ण २०१५-प्र.क्र. १७६-ल-१, दिनांक २९ जुलै, २०१५ अन्वये प्रसिद्ध तात्पुरत्या प्रमाणभूत किमान क्षेत्राच्या संदर्भात प्राप्त हरकतींचा विचार करून खालील अनुसूचीतील स्तंभ (२) मधील जमिनीच्या प्रकारांकरिता, स्तंभ ३ मधील क्षेत्र, महानगरपालिका व नगर पालिका हद्दी वगळता, यवतमाळ जिल्ह्यातील उर्वरित सर्व क्षेत्राकरिता सुधारित करण्यात आलेले प्रमाणभूत किमान क्षेत्र म्हणून घोषित करीत आहे ;

अनुसूची

| स्थानिक क्षेत्र | जमिनीचा वर्ग | प्रमाणभूत किमान क्षेत्र |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| यवतमाळ जिल्हा (महानगरपालिका व नगर पालिका हद्दीतील क्षेत्र वगळता) | जिरायत (कोरडवाहू) (म्हणजेच सिंचन नसलेले) | ० हे. ८० आर |
| | तरी (म्हणजेच हंगामी बागायती) | ० हे. ४० आर |
| | बागायत (म्हणजेच बारमाही बागायती) | ० हे. २० आर |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

डॉ. माधव वीर,
शासनाचे उप सचिव.

2066

**REVENUE AND FORESTS DEPARTMENT**

Mantralaya, Main Building, 1st Floor, Madam Cama Marg,
Hutatma Rajguru Chowk, Mumbai - 400 032.
Dated the 19th December, 2015.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA PREVENTION OF FRAGMENTATION AND CONSOLIDATION OF HOLDINGS ACT.—

No. Sankirn-2015-C.R.-176-L-1.—

In Exercise of the Powers conferred by sub-sections (*2*) and (*3*) of Section 5 of the Maharashtra Prevention of Fragmentation and Consolidation of Holdings Act (LXII of 1947) and in supersession of the Government Notification, Revenue Department, No. CON. 3360-33065-M, dated the 14th May, 1962 published in the Maharashtra Government Gazette, Part-IV-B, dated the 17th May, 1962, to the extent it relates to the Yeotmal District, the Government of Maharashtra, after duly considering the objections received pursuant to the provisionally settled minimum area notified under sub-section (*2*) of Section 4 of the said Act, *vide* Government Notification, Revenue and Forests Department No. Sankirn-2015-CR-176-L-1, dated the 29th July, 2015, hereby gives public notice of the standard minimum areas specified in column (*3*) of the Schedule appended hereto, which the Government of Maharashtra has revised under sub-section (*2*) of the said Section 5, for the class of land specified in column (*2*) thereof, in the area of the Yeotmal District, excluding the areas comprised in the Municipal limits of all Municipal Corporations and Municipal Councils, specified in column (*1*) of the said Schedule.

SCHEDULE

| Local Areas (1) | Class of Land (2) | Standard Minimum Area (3) |
|---|---|---|
| Yeotmal District (excluding the areas comprised in the Municipal limits of all Minicipal Corporations and Municipal Councils) | Jirayat (Dry Crop) (*i.e.* Unirrigated) | 0 H. 80 A. |
| | Tari (*i.e.* Seasonal *Bagayati*) | 0 H. 40 A. |
| | Garden (*i.e.* Perennial *Bagayati*) | 0 H. 20 A. |

By order and in the name of the Governor of Maharashtra.

Dr. MADHAV VEER.
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT PRESS, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

२७५/पाने २७८

# महाराष्ट्र शासन

क्रमांक: संकीर्ण-२०१५/प्र.क्र.१७६ /ल-१
महसूल व वन विभाग, मंत्रालय,
मुख्य इमारत, १ ला मजला
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
dol१cell.rfd@maharashtra.gov.in
revenuedol१cell@gmail.com
दि. ४ जानेवारी, २०१६

प्रति,

१) विभागीय आयुक्त, अमरावती,
२) जिल्हाधिकारी, यवतमाळ.

**विषय:-** यवतमाळ जिल्ह्याकरीता सुधारित करण्यात आलेल्या प्रमाणभूत क्षेत्राबाबतची अधिसूचना.
**संदर्भ:-** जिल्हाधिकारी, यवतमाळ यांचे क्र.अका / भूसुधार का.वि./१६९५/२०१५, दि.१०.१२.२०१५ चे पत्र.

उपरोक्त संदर्भाधीन पत्रास अनुसरून कळविण्यात येते की, महानगर पालिका व नगर पालिका हद्दी वगळता, यवतमाळ जिल्ह्यातील उर्वरित सर्व क्षेत्राकरीता समक्रमांकित शासन अधिसूचनेन्वये सुधारित करण्यात आलेले प्रमाणभूत क्षेत्र महाराष्ट्र शासनाने असाधारण राजपत्र भाग ४-ब, दिनांक १९ डिसेंबर, २०१५ अन्वये प्रसिध्द केले असून सदर अधिसूचनेच्या २५-२५ प्रती यासोबत पुढील कार्यवाही करणेकरीता पाठविण्यात येत आहेत.

(विलास थोरात)
अवर सचिव

सहपत्र:- वरीलप्रमाणे.

C:\Users\vidya.waghmare\Desktop\om new\जिल्हाधिकारी अहवाल व परस्पर कार्यवाही\जिल्हाधिकारी यवतमाळ.docx